RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक–कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ११, अंक ६९] बुधवार, डिसेंबर २४, २०२५/पौष ३, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००

असाधारण क्रमांक ९६

प्राधिकृत प्रकाशन

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांजकडून

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक उपजिभूक.७/भूसं/मुंउजि/एलएक्यू-८४३/२०२४.— मौजे मालाड, तालुका बोरीवली, जिल्हा मुंबई उपनगर येथील "भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३" अंतर्गत न.भू. क्र.८२७ अ भाग, स. क्र.२३९ भाग या जमिनीचे भूसंपादन.

ज्याअर्थी, प्रस्तुत भूसंपादन प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाला असून प्रकरणी भूसंपादनाची कार्यवाही करणेकरीता जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक १० ऑक्टोबर, २०१८ रोजीचे आदेशान्वये उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र.७ यांना पदनिर्देशित केले आहे. प्रकरणी कलम ११ ची अधिसूचना दिनांक २५ऑक्टोबर २०१८ रोजी व कलम १९ (१) ची अधिसूचना दिनांक ११ जानेवारी २०१९ रोजी प्रसिध्द झाली आहे ;

ज्याअर्थी, विहीत मुदतीत निवाडा घोषित करणे शक्य नसल्याची जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांची खात्री झाल्याने व भूमी संपादन अधिनियम, २०१३ चे कलम २५ अन्वये अधिसूचना **महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात** प्रसिध्द करणेत येऊन निवाडा घोषित करण्याच्या कालावधीत प्रथम १२ महिने नंतर ६ महिने, ६ महिने व तदनंतर १२ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आलेली होती. तसेच W. P. (L) No. ६०४२ / २०२० (W.P. No. २६०० / २०२१), अवमान याचिका (एल) क्र.२८९/२०२२ रिट याचिका क्र. २००५/२०१४ मध्ये मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक ७ जानेवारी २०२२ रोजीच्या आदेशास अनुसरुन दिनांक ३१ मार्च २०२२ पर्यंत आणि दिनांक ५ मे २०२२ रोजीचे आदेशान्वये तसेच दिनांक २९ जून २०२२ व दिनांक २३ सप्टेंबर २०२२ रोजीचे आदेशान्वये प्रकरणी ३ महिन्यांची पुनःश्च मुदतवाढ दिली होती ;

ज्याअर्थी, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र.७ यांनी सादर केलेल्या प्रस्तावामध्ये मा.उच्च न्यायालयात बृहन्मुंबई महानगरपालिकेने संपादनाखालील जमिनीच्या क्षेत्राबाबत दाखल केलेली Notice of Motion (L) No. 103/2019 याचिका, तसेच हितसंबंधितांनी संपादनाखालील क्षेत्राबाबत आक्षेप नोंदविलेला आहे व मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या W. P. (L) No. ६०४२ / २०२० (W. P. No. २६०० / २०२१), अवमान याचिका (एल) क्र.289/2022, W.P.No. २००५/२०१४ मध्ये Review Petition (L) No. ४५ (L) / २०१९ (३८ / २०२१), Notice of Motion (L) No. १०३/२०१९ या होत्या ;

ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालयाने W. P. (L) No. ६०४२ / २०२० (W. P. No. २६०० / २०२१), अवमान याचिका (एल) क्र.२८९/२०२२ रिट याचिका क्र. २००५/२०१४ मध्ये दिनांक २२ डिसेंबर २०२२ रोजीचे आदेशान्वये प्रकरणी ३ महिन्यांची पुनःश्च मुदतवाढ दिली होती. सदरची मुदतवाढ पूर्ण झाल्याने मा. उच्च न्यायालयाने उक्त याचिकेमध्ये दिनांक ६ मार्च २०२३ रोजीचे आदेशान्वये प्रकरणामध्ये दिनांक २८ एप्रिल २०२३ पर्यंत मुदतवाढ दिली होती. परंतु सदर मुदतीचा कालावधी समाप्त होत असल्याने मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. २६००/२०२१ मध्ये आदेश दिनांक २१ मार्च २०२४ अन्वये दिनांक २० मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली होती. सदर कालावधी पूर्ण होत असल्याने मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. २६००/२०२१ मध्ये आदेश दिनांक १९ मार्च २०२५ अन्वये ६ महिन्यांची मुदतवाढ दिली होती. तथापि, अंतिम निवाडा पारित करण्यात आलेला नसल्याने मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी सदर प्रकरणी आंदेश दिनांक १६ सप्टेंबर २०२५ अन्वये २ महिन्यांकरिता व आदेश दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ अन्वये दिड महिन्यांकरिता म्हणजे दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजीपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, अद्यापी मा. उच्च न्यायालयात सदर प्रकरण प्रलंबित असल्याने कलम १९ च्या अधिसूचनेच्या अनुषंगाने उपरोक्त कलम २५ च्या अधिसूचनेद्वारे वाढीव कालावधीत निवाडा घोषित करणेस झालेल्या विलंबास समर्थन करणारी परिस्थिती असून सदर मुदतीत निवाडा घोषित करणे शक्य नसल्याची माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २५ अन्वये, समुचित शासन म्हणून प्राप्त अधिकारानुसार व मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा प्रस्तुत प्रकरणात अंतिम निवाडा पारित करण्यास या अधिसूचनेव्दारे दिनांक १९ सप्टेंबर २०२५ पासून पुढे दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी पर्यंत मुदतवाढ मंजूर करण्यात येत आहे.

अनुसूची- एक

जमिनीचे वर्णन

मौजे - मालाड **तालुका - बोरीवली** **जिल्हा - मुंबई उपनगर**

अ.क्र	न.भू.क्र.	स.क्र.	कलम १९ (१) चे दिनांक २९/०८/२०२० रोजीचे शुध्दीपत्रकानुसार अधिसूचित केलेले क्षेत्र (चौ.मी.)
१	८२७अ	२३९पै.	१,४२,८२३.८०

संपादनाचे प्रयोजन :- पुनर्वसन व पुनर्स्थापन, २- महानगरपालिका शाळा व विकास नियोजन रस्तेकरिता भूसंपादन.

ठिकाण वांद्रे, मुंबई.
दिनांक : २४ डिसेंबर २०२५,

सौरभ कटियार,
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.